# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी वचनबद्ध असल्याचं सरकारने आज लोकसभेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी, २०१९ पासून सरकारने उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के नफा देऊन किमान आधारभूत किंमत दर निश्चित केले असल्याचं सांगितलं. नारळ उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनला आहे आणि नारळावर होणाऱ्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार पुरेसे उपाय करत आहे, ही समाधानाची बाब असल्याचं चौहान म्हणाले.

वर्ष २०३१-३२ पर्यंत देशात वीजेची उत्पादन क्षमता ८७४ गीगावॅट पर्यंत वाढवण्याची योजना असल्याचं, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी आज राज्यसभेत सांगितलं. यामध्ये कोळसा, लिग्नाईट आणि सौर, पवन तसंच जलविद्युत सारख्या नवीकरणीय स्त्रोतांचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, राज्यसभेत उपसभापती हरिवंश यांनी महाकुंभ घटनेवर चर्चा करण्याची मागणी करणारा काही विरोधी सदस्यांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळून लावला.

दोन्ही सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभषाणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु झाली. लोकसभेत आज संध्याकाळी पाच वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी या चर्चेवर उत्तर देतील.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दिल्लीत जम्मू आणि काश्मीरच्या सुरक्षेबाबत आढावा बैठक घेणार आहेत. या बैठकीला जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, गृहसचिव गोविंद मोहन तसंच केंद्रीय गुप्तचर संस्थांचे प्रमुख आणि वरीष्ठ अधिकारी उपस्थित असतील.

****

उत्तर प्रदेशमध्ये प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळाव्याचा आज २३ वा दिवस आहे. काल वसंत पंचमीच्या मुर्हुतावर अमृतस्नानामध्ये दोन कोटी ५७ लाख भाविक सहभागी झाले होते. आत्तापर्यंत जवळपास ३८ कोटी भाविकांनी संगमावर स्नान केलं आहे.

दरम्यान, भुतान नरेश जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आज कुंभमेळ्यामध्ये सहभागी झाले असून, त्यांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यावेळी उपस्थित होते. संगमावर हनुमान मंदिरामध्ये ते पुजाअर्चा करणार आहेत. भुतान नरेश आज महाकुंभ नगरीतल्या केंद्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कुंभमेळ्याची पाहणी देखील करणार आहेत.

****

मुंबई महानगरपालिकेचा २०२५-२६ यावर्षाचा ७४ हजार ४२७ लाख ४१ हजार कोटी रुपयांचा आणि ६० कोटी ६५ लाख रुपये शिलकीचा अर्थसंकल्प आज पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पालिका अतिरिक्त आयुक्त अमित सैनी आणि अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सादर केला. महापालिकेचा यंदाचा अर्थसंकल्प १४ पूर्णांक १९ टक्क्यांनी वाढला आहे.

****

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या निवडणुकीत ६९९ उमेदवार रिंगणात असून, एक कोटी ५६ लाखाहून अधिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. दिल्ली पोलीस आणि निम लष्करी दलाच्या तुकड्या पाचारण करण्यात आल्या आहेत. शनिवारी आठ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

महिलांनी संघटित होऊन आपल्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असं आवाहन विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी केलं आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी नाशिक इथं त्यांनी काल विशेष बैठक घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. महिलांचं संघटन यासह विविध मुद्यांवर बैठकीत चर्चा झाली. पोलीस, वकील आणि डॉक्टर यासारख्या अधिकाऱ्यांच्या सहकार्यानं जनता दरबार आयोजित करणं गरजेचं आहे, तसंच महिलांना कार्यसंस्कृतीत सकारात्मक बदल घडवून एकत्र राहण्यावर भर द्यावा, असंही त्या म्हणाल्या.

****

जागतिक कर्करोग दिनानिमित्त नागपूर इथल्या राष्ट्रसंत तुकडोजी कर्करोग रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्यावतीनं आज जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी विविध घोषवाक्य तसंच पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या फेरीत विविध आरोग्य महाविद्यालयातले डॉक्टर, परिचारिका यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते.

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठानं २०२२ आणि २०२३ या वर्षांच्या विशाखा काव्य पुरस्कारांची काल घोषणा केली. २०२२ या वर्षाचा पुरस्कार सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कणकवलीच्या सरीता पवार यांच्या 'राखायला हवी निजखूण' या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे. तर २०२३ चा पुरस्कार पुण्यातले तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या 'जळताना भूई पायतळी' या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं देवगिरी महाविद्यालयात येत्या ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान ३४ व्या फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलं आहे. या व्याख्यानमालेत पत्रकार राजू परूळेकर, अर्थतज्ज्ञ नीरज हातेकर आणि ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचं व्याख्यान होणार आहे.

****